## <u>प्रेस नोट</u>

शनिपेठ पो.स्टे.जळगाव
दिनांक 24/02/2025

प्रति

मा. संपादक
सर्व वृत्तपत्र व वृत्त वाहिनी

**विषय- महिलांचे गळयातील सोन्याची मंगळपोत स्नॅचिंग करुन चोरी करणाया इसमास अटक**

वरील विषयांन्वये सादर आहे की,माहे जानेवारी व चालू फेब्रुवारी महिन्यात जळगाव शहरातील जुना खेडी रोड परिसरात रात्री 09.00 ते 10.00 वाजेच्या सुमारास फिरायला जाणाया महिलांच्या गळयातून मंगळसुत्र हिसकावण्याचे प्रकार घडलेले होते. त्याबाबत शनिपेठ पोलीस स्टेशन व MIDC पोलीस स्टेशनला जबरी चोरीचे गुन्हे दाखल होते. सदर गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करणे बाबत मा. पोलीस अधिक्षक मा.अप्पर पोलीस अधिक्षक जळगाव व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव यांनी सुचना दिलेल्या होत्या त्या अनुषंगाने वेगवेगळ्या घटनांचे दिवशीचे सी.सी.टी.व्ही फुटेज व तांत्रिक पुराव्याच्या आधारावर सदर गुन्हे करणारा इसम नामे **गणेश राजेंद्र माळी वय 29 वर्षे रा. आसोदा ता. जि. जळगाव** यास ताब्यात घेण्यात आलेले असून अधिक चौकशी करता सदरचा आरोपी हा जळगाव MIDC येथे A.K. स्विच कंपनी येथे रोजंदारीवर काम करीत असून शनिवारी व रविवारी कंपनीस सुट्टी असतांना सदरचे गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे.सदर गुन्हे करण्यासाठी त्याने स्वतःची हिरो होन्डा पॅशन मोटारसायकलचा वापर केलेला असल्याची कबुली सदर आरोपीने दिलेली आहे.सदर आरोपीने खालील गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

| अ.न. | पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर | घटनेचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|
| 1 | शनिपेठ पोलीस स्टेशन 17/2025 BNS 309(4) | 25/01/2025 रोजी 21.23 वाजता जुना खेडी रोड |
| 2 | शनिपेठ पोलीस स्टेशन 28/2025 BNS 309(4) | 09/02/2025 रोजी 21.23 वाजता जुना खेडी रोड |
| 3 | MIDC पोलीस स्टेशन /2025 BNS 309(4) | 22/02/2025 रोजी 21.23 वाजता सदोबा नगर एस.टी.वर्क शॉप जवळ |

सदर आरोपी कडून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेले एकुण 23 ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल हस्तगत करण्याची प्रक्रीया चालू आहे

सदर कारवाई ही पो.नि. रंगनाथ धारबळे तसेच API साजिद मंसूरी, PSI योगेश ढिकले, HC/1356 विजयखैरे, पोकॉ/2001 विक्की इंगळे, तसेच नेत्रम विभागातील पोकॉ485 मुबारक देशमुखव पोकॉ/ पंकज खडसे यांनी अशांनी केली आहे.

पोलीस निरिक्षक
शनिपेठ पो.स्टे.जळगांव
सत्यमेव जयते

रंगनाथ धारबळे
पोलीस निरीक्षक
शनिपेठ पो.स्टे.,जळ...

